Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 7, Aug 2012
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# जणकल्याणकारी राजा: छ.शाहू महाराज

शिंदे संग्राम रामचंद

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा जि. ठाणे

***प्रस्तावना –***

"राज्य काय माझा प्राण घेतलात तरी बेहत्तर पंरतु मी माझे अस्पृश्योध्दारचे जे कार्ये हाती घेतले आहे ते थांबवणार नाही", असे ब्रिटीशांना ठणकावुन सांगणारे छ. शाहु महाराज सा-या भारतातील ब्रिटीश साम्राज्यातंर्गत असणा-या संस्थानिकात एकमेव राजे होते. जेव्हा संपुर्ण भारतदेश ब्रिटिशांच्या अंमलाखाली येत होता, एकामागुन एक संस्थाने ब्रिटीश खालसा करीत होते तेव्हा मराठीशाहीचा व पेशवाईचा अस्त झाला होता. कंपनी सरकारचा अंमल सा-या भारतभार सुरू झाला. ब्रिटीश सरकारने त्यांच्या नियंत्रणाखाली वारसा हक्क मान्य केले असले तरी कोल्हापुर संस्थानाचा वारस कोण असावा व कसा असेल याबाबत चर्चा सुरू झाली होती. ताराबाईनंतर राजगादीवर आलेल्या चौथ्या शिवाजी महाराजांचा मोठयाप्रमाणात अमानवीय छळ (दत्तक घेतल्यावरून) केला गेला होता. त्यांच्या मृत्यूनंतरही करवीर संस्थानावर अवकळा आली होती. कारण या संस्थानाला कोणी वारस उरला नव्हता, छ. शिवाजी महाराजाच्या मृत्युनंतर मराठीशाहीत पेशवाईच्या अनन्वयीत छळामुळे मराठेशाही सैरावैर झाली होती. त्यातल्यात्यात अस्पृश्य मानले गेलेल्या रयतेच्या जीवात जीव नसल्यासारखे झाले होते. आता तरी सुखाचे दिवस येतील काय, या अनिश्चित आशेच्या किरणाचा एक छोटासा धागा धरून जगत होते.

त्यातल्यात्यात अस्पृश्य मानले गेलेल्या रयतेच्या जीवात जीव नसल्यासारखे झाले होते. आता तरी सुखाचे दिवस येतील काय, या अनिश्चित आशेच्या किरणाचा एक छोटासा धागा धरून जगत होते. त्यांनाच त्यांच्या जीवनाचा कंठाळा आला होता. अस्पृश्याबरोबरच शेतकरी व सर्वसामान्य लोक एका कठीण परिस्थितीतुन जात होते. सर्वांना एकच चिंता भेडसावत होती की, छ. शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेल्या गदीवर योग्य ती व्यक्ती राजपदावर येईल काय. . . ? आली तरी कशी असेल ? लोकांच्या कल्यासासाठी झटणारी तसेच रयतेच्या समस्या जाणुन घेणारी मिळेल का किंवा पेशवाई पुन्हा कोल्हापुरसारख्या शिवरायांचा वारसा लाभलेल्या गादीवर येईल . . ! करवीर म्हणजेच कोल्हापुर संस्थान बरखास्त करून ब्रिटीशांचाच प्रत्यक्ष अमल राहील . . . ? या आणि अशा अनेक प्रश्नांच्या गर्तेत कोल्हापुर जनता जगत होती. . . आणि एके दिवशी रयतेच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले. त्यांच्या आशेचा किरण प्रत्यक्षात आला. सोनेरी सकाळ झाली. करवीर संस्थानाला वारसा मिळाला. राजगादीवर राजा विराजमान झाला. राजांचा राजाभिषेक झाला (**17 मार्च 1884**). सर्वांच्या चेह-यावर आंनद ओसंडुन वाहत होता. आपल्या राज्याला पाहण्याची उत्कंठ इच्छा सर्वांना लागली होती. पंरतु त्या चिमुकल्याला, राजा व राजगादी यांची कल्पना ती कसली ! माझे कैतुक करतात, माझी प्रशंसा होते, मला कोणीतरी चांगले मानतात या एवढया संकुचित भावनेच्या विश्वातच ते चिमुकले बाळ नाचत होते, डैलत होते. हो! तेच बाळ, यशंवत पुढे त्यांनी स्वत:च्या कतृत्वाने आणि कौशल्याने छत्रपती, महाराज आणि एल. एल. डी. (केंब्रिज विद्यापीठ)या महत्वाच्या पदव्या मिळवल्या. त्यांनाच छ. शाहु महाराज म्हणतात.

छ. शाहु महाराजांचे मुळ नाव यशवंत, वडिलांचे जयशिंगराव घाटगे, त्यांच्या आईचे नाव राधाराणी. ते मुळचे कागलचे राहणारे. बाळ यशवंत लहानपणी गोरागोमटा, शरिराने पीळदार धष्ठपुष्ट असा राजबिंडा. लहानपणापासुनच 'महा'राजा यशंवताचा कुस्तीकडे ओढा होता. कुस्ती हा त्यांच्या आवडीचा खेळ. वस्ताद दत्तोबा हे कुस्तीचे त्यांचे गुरू. परंतु यशवंत जेव्हा कुस्तीच्या आखाडयात कुस्ती करण्यासाठी उतरत असे तेव्हा 'महा'राजा म्हणुन यशंवतरांवाशी दुसरा कोणताही पैलवान कुस्ती धरण्यास तयार होत नसत, ते घाबरत असत. शेवटी 'माझ्याशी कुस्ती धरण्यास कोणताही संकोच करू नका' असे म्हणावे लागत असे आणि मग कोणता तरी मारूती सारखा पैलवान कुस्ती करण्यास मिळत असे. पुढे चालुन महाराजांनी कोल्हापुरला कुस्तीचे आखाडे उभारून कोल्हापुरला **1895** मध्येच 'मोतीबाग तालीम' ची स्थापना केली. 'मल्लविद्या' कोल्हापुर भूमिवर रूझविणारे त्याची जोपासण्याचे व त्यात वाढ करण्याचे काम छ. शाहु महाराजांनी केले. कुस्तीच्या खेळात कोल्हापुरला कुस्तीची पंढरी बनविले.

राजे जयसिंगराव महाराज यांना असे वाटत होते की, पाश्चात्य शिक्षणापेक्षा देशी शिक्षण यशवंतरावाना आपल्या या वातावरणाशी जवळीकता साधण्यास आधिक चांगले आहे. येथे राहुन अध्ययनाबरोबरच राज्यकारभाराचे धडे शिकण्यास मदत होईल या उद्देशाने यशवंताला राजे जयसिंगराव महाराजांनी राजकोट आणि नंतर धारवाड येथे शिक्षणासाठी पाठवले. तेथे राहुन यशवंतरावांनी अधिक चांगल्या प्रकारे शिक्षण पुर्ण केले. शिक्षण घेत असताना त्यांना देशातील अनेक वाईट चालीरीती दिसुन आल्या. एक वर्ग दुस-या वर्गाची कशी पिळवणुक करीत आहे एवढेच नाही तर या देशात माणसाला माणसासारखे वागविले जात नाही. कुत्र्या-मांजराला किंमत आहे परंतु माणसाला या ठिकाणी किंमत नाही. वेठबिगारीच्या माध्यमातुन जमीनदार तर सावकार कुळांची कशी पिळवणुक करीत आहेत याची कल्पना यशवंत या

**Please cite this Article as : शिंदे संग्राम रामचंद, जणकल्याणकारी राजा: छ.शाहू महाराज : Indian Streams Research Journal (Aug. ; 2012)**

युवराजाना येत होती . ब्राम्हणशाहीने या देशात स्वत:ची मक्तेदारी निर्माण करून आपणच सर्वेसर्वा असल्याचे भासवुन इतर वर्गाची कशी  पिळवणुक करीत होते याची कल्पना वाढत्या अनुभवातून छ . शाहु महाराजांना येत होती .  सर्वात महत्वाची बाब  म्हणजे प्रशासनात सावळा-गोंधळ निर्माण झाला होता . जणकल्याणाची कामे तर सोडाच परंतु कोल्हापुर संस्थान लयास जाण्याची वेळ आली होती .  शेवटी  छ . शाहु महाराजांनी करवीर संस्थानाच्या राज्यकारभाराची सारी सुत्रे आपल्या हाती घेतली (**2** एप्रिल **1894**) .

छ . शाहु महाराजांनी करवीर संस्थानाच्या राज्यकारभाराची सुत्रे आपल्या हाती घेताच क्षणी एक जाहीरनामा काढला त्या जाहीरनाम्यात छत्रपती शाहु महाराज म्हणतात, “ . . . आजपर्यत आम्ही अल्पवयी असल्याकारणाने कोल्हापुर संस्थानांचा राज्यकारभार 'कौन्सिल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन' यांच्या हातून चालवण्यात येत होता . पंरतु आम्ही आता प्रौढावस्थेत असल्याकारणाने आज रोजी त्यांची कारकिर्द संपवून आमच्या राज्याचा पुर्ण अखत्यार  आमच्या हाती आला आहे व त्याप्रमाणे आम्ही आज म्हणजे तारीख दोन माहे एप्रिल इसवी सन एक हजार आठशे चौ-याण्णवपासुन तो चालविण्यास सुरूवात केली आहे .

आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहुन सुखी असावी तिच्या कल्याणाची सतत वृध्दी व्हावी व आमच्या संस्थानची हरएक प्रकारे सदोदित भरभराट होत जावी,अशी आमची उत्कट इच्छा आहे . . . ” हा होता करवीर संस्थानात जनकल्याणाचा पहीलाच जाहीरनामा .

## जणकल्याणासाठी झटणारा राजा:

छ . शाहु महाराज राज्यकारभाराची सुत्रे हाती घेताच रयतेच्या कल्याणाची अनेक जाहीरनामे काढु लागले . जणकल्याणाची कामे करावयाची असतील तर लोकांचा सहभाग असायला पाहीजे असतो . परंतु लोकांवर पुर्वीपासुन राजाचा जो धाकयुक्त वचक निर्माण झाला होता त्यामुळे लोक राजपदावर आलेल्या व्यक्तिला जबरदस्त भीत असत . तशीच भीती राजा छत्रपती शाहु महाराजांचीही वाटत होती हे महारांजाना समजण्यास वेळ लागला नाही . म्हणुन छ . शाहु महाराज लोकांना आपलेपणाच्या भावनेने, मायेच्या ममतेने बोलु लागले .  रयतेच्या सुखदु:खात सामिल होऊलागले, त्यांच्या दु:खाचे निवारण करू लागले . म्हणुन लोकांना आपला राजा आहे असे वाटु लागले .  लोकही महारांजाशी संपर्क साधु लागले आपले, आपले ग-हाणे त्यांच्यापुढे मांडु लागले .  लोकांना आपल्या जिवनाचे सार्थक हा युवराज करू शकेल याची खात्री वाटु लागली आणि बघता बघता ते भाकित प्रत्यक्षात येण्यास सुरूवातही झाली आणि त्याची प्रचिती **1896** मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळ आणि प्लेगच्या निवारणासाठी छ . शाहु महाराजांनी केलेल्या प्रयत्नातुन आली .

जेव्हा महाराट्रात सन **1896** मध्ये प्लेगने व दुष्काळाने उग्ररूप धारण केले होते त्यात गुरा-ढोराप्रमाणेच माणसेही मरत होती .  अशा परीस्थितीत छत्रपती शाहु महाराजानी सर्व परिस्थितीचा अभ्यास केला . योग्य ते धोरण आखून ही परिस्थिती व्यवस्थित हातळुन यावर मात केली .  प्लेगवर मात करण्यासाठी महाराजांनी स्वतंज्य विभाग निर्माण केले . विशेष म्हणजे वैद्यकीय आधिकारी किंवा या विभागातील कोणताही नौकर अयोग्य काम करीत असेल किंवा उपचार करण्यास दिरगांई करीत असेल तर त्यांची व प्लेगची माहीती देणा-यास महाराजांनी बक्षिसे ठेवले होते . त्यामुळे महाराजाना प्लेगवर मात करण्यात मोठे यश मिळाले . तलाव, विहीरी, धरणे बांधण्याचे संकल्प सोडुन हाताला काम व भुकेलेल्यांना अन्न देण्याचे यशस्वी प्रयत्न केले .  जागतिक किर्तीचे अभियंते सर विश्वेश्वरय्या यांच्या सल्ल्यानुसार पंचगंगा, वारणा, दुधगंगा, भोगावती या नदयावर धरणे बांधून जलसिंचणाच्या सोयी केल्या .  राधानगरीसारख्या धरणाची कल्पना साकारून ती पुर्णत्वास आणली .  त्यामुळे शेतीक्षेत्र सिंचनाखाली आले .  दुष्काळावर मात करण्याबरोबरच शेतीक्षेत्र जास्तीतजास्त सिंचनाखाली आणून शेती उत्पादनात वाढ करण्याचे तसेच शेतक-यांचे जिवनमान सुधारण्याचे प्रयत्न सुरू केले . त्यासाठी मोठमोठे धरणे बांधुन दिले . त्यासंदर्भाचा एक महत्वाचा जाहीरनामा **3** फेब्रूवारी **1902** मध्ये प्रसिध्द केला . त्यात छत्रपती शाहु महाराज म्हणतात, “ . . दुष्काळाचा प्रतिबंध करण्यास पाटबंधा-याच्या कामाचा फार उपयोग होतो असे नजरेस आल्यावरून मोठमोठया तळयाची कामे सुरू करण्यात आली आहेत . . . . संस्थानात असलेले तलाव सरकारी व खाजगी विहीरीवर किती एकर जमीन भिजते याचा प्रत्येक तालुक्याचा गाववार निराळा तक्ता करणेचा ,या तक्त्यात किती मोटास किती दिवस पुरते व  कोणते जातीचे पिके दरसाल होतात व विहीर सुधारणेजोगी आहे की कसे , ही माहीती असावी . तलावाचीही याप्रमाणे माहीती देऊन निराळा तक्ता करणेचा आहे . . . ”

छत्रपती शाहु महाराजांच्या या दुरगामी धोरणामुळे कोल्हापुर संस्थान कृषीक्षेत्र सिंचनाखाली आणण्यात तसेच कृषी उत्पादनात एक अग्रगण्य मानण्यात येवु लागले . एवढेच नाही तर शेतीक्षेत्राला कर्जपुरवढा करण्यासाठी  सहकारी संस्था स्थापन केल्या शेतक-यांची कर्जे माफ केले . त्यामुळे शेतकरी सुखावला .

## कुलकर्णी वतन खालसा केले .

त्याकाळी कुलकर्णी हा गावचा राजा असत कारण तोच त्या गावचा साक्षर व धर्मा'अ'ज्ञानी असत आणि गावातील लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेवुन त्यांच्याकडुन लिहुन त्यावर त्यांचा आंगठा घेत असत . अल्पशी रक्कम देवुन त्यावर भरमसाठ व्याज अकारत असत . गावातील सावकाराची मदत घेऊन त्या शेतक-यांची त्याच्या आयुष्यभर सुटका होऊदेत नसत . ऐवढेच नाही तर त्याच्या पुढील पिढयावर त्याच कर्जाचा बोजा लादत असत . त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी व मजुर मोठया प्रमाणात नडला जात असे म्हणुन म . जोतिराव फुले त्यास 'ग्रामराक्षस' म्हणत असत . शाहु महाराजांवर म .  फुलेच्या 'गुलामगिरी'चा, 'शेतक-याचा असुडाचा', आणि विशेष म्हणजे मुकुंदराव पाटील यांनी लिहलेल्या 'कुलकर्णीलीलामृत' या ग्रंथाचा प्रभाव होता . म्हणुनच शाहु महाराजांनी हे “कुलकर्णी वतन” किती राक्षशी स्वरूपाचे आहे याची कल्पना आली .  माझ्या संस्थानातील जनतेला हे “कुलकर्णी वतन” सुखाने जगु देत नाही म्हणुन त्यांनी  **2** मार्च **1918** रोजी एक वटहुकुम काढुन 'कुलकर्णी वतन' नष्ट करून त्या जागी प्रशिक्षित तलाटी नेमण्याची व्यवस्था केली . त्यामुळे अज्ञान शेतक-यांची होणारी फसवणुक तर कमी झालीच शिवाय सावकारांच्या जाळयातुन शेतक-यांची मुक्तता झाली . त्यामुळे करवीर संस्थानातील जनताच नव्हे तर सारा भारत देश या जाणत्या राजाचे उपकार कधीही फेडु शकणार नाही .

महाराष्ट्रामध्ये पारधी व अशा अनेक भटक्या विमुक्त जमाती होत्या, ज्यांना भारतातील वर्णव्यवस्थेने नाकारले होते . सर्वांनी बहिष्कृत केले होते . या जमातीना कोणीच वाली नव्हता . त्यांची एकीकडून ब्रिटीशांकडून गळचेपी होत होती तर दुसरीकडून ब्राम्हणी वर्णव्यवस्थेचे शिकार बनले होते .  त्यातल्यात्यात पारधी या जमातीला ब्रिटीशांनी गुन्हेगारी प्रवृत्तीची जमात म्हणुन शिक्कामोर्तब केले होते . या जमातीकडे उत्पन्नाचे कोणतेच साधन नव्हते . त्यामुळे त्यांना पोटाची खळगी भरण्यासाठी, पोराबाळांना जगवण्यासाठी कधी कोण्या ऐक्याने चोरी, दरोडा केली असेलही म्हणुन  ब्रिटीशांनी अख्या जमातीलाच जन्मोजन्मीचा शिक्काच मारला की, ही जमात गुन्हेगारी प्रवृत्तीची आहे . ही बाब छत्रपती शाहु महाराजांना ओळखायला वेळ लागला नाही . ही जमात गुन्हेगार प्रवृत्तीची नाही तर गुन्हेगार आपण आहोत . त्यांच्यावर आज जी वेळ आली आहे ती आपल्यामुळेच . म्हणुन या लोकांना सुधारावयाचे असेल तर आपणच पुढाकार घेवुन त्यांना आपलंस करा . त्यांना उत्पन्नाचे साधन निर्माण करून द्या असे छ . शाहु महाराज मनत असत . केवळ बोललेच नाहीत तर त्यांनी त्यांच्याशी जवळीकता साधली, समजावुन सांगावयास सुरूवात केली .  अशा गैरमार्गाचा अवलंब करू नका असा उपदेश दिला .  लागेल ते काम करा म्हणुन शाहु महाराजांनी आपल्याच संस्थानात त्यांना रोजगार निर्माण करून दिला . सोनतळयावरील बांधकामासारखे अनेक बांधकाम तसेच रस्त्याचे कामे त्यांच्याकडुन करून घेतले .  त्यांना शिक्षण घेण्याची प्रेरणा दिली . शिकलेल्यांना आपल्याच संस्थानात नैक-या दिल्या .  वेठबिगारीची पध्दत बंद करून कामगाराची होणारी पिळवणुक थांबवली .  'बलुतेदार पध्दती'  बंद करणारा ऐतिहासीक कायदा करून ग्रामीण भागातील बलुत्या आलुंत्यास सर्व व्यावसाय करण्याचे स्वातंज्य देणारा जाहीरनामा काढला गेला .  'महार वतन' बंद केले . महार वतन बंद केल्यामुळे डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी छ . शाहु महाराजांचे ऋण पुढील शब्दात व्यक्त केले “कै . शाहु महाराजासारखा 'सखा' अस्पृश्यांना पुर्वी लाभलेला नव्हता व पुढे लाभेल की नाही याबद्दल आम्हास शकांच आहे . त्यांना पक्केपणी कळुन चुकले होते की, वतनामुळे महारांची अधोगती झाली आणि आपल्या अधिकारांच्या जोरावर कोल्हापुर संस्थानातील महाराची वतने

जबरदस्तीने खालसा केली . . . .वतन गेल्यामुळे कोल्हापुर संस्थानातील महारांची स्थिती सुधारली . ”

मनुस्मृतीत म्हटले आहे की, “ शुद्राची जी संपत्ती असेल ती संपत्तीच ब्राम्हणाच्या मालकीची नाही तर शुद्राचे श्रम देखील त्यांच्या मालकीचे आहे .म्हणुन ब्राम्हण त्यांच्याकडुन वाटेल तेव्हा विनामुल्य कितीही श्रम करून घेऊशकतो” या नियमाप्रमाणे ब्राम्हण व उच्चवर्णीय शुद्रांची मोठया प्रमाणात पिळवणुक करीत असत . विशेषत महार, मांग या जातीतील लोकांना अक्षरश: गुलामापेक्षाही वाईट रीतीने वागविले जात होते . भाकरीच्या शिळया तुकडयासाठी रात्रंदिवस उच्चवर्णियांच्या घरी राबावे लागत असे .त्यास नकार दिला तर त्यांच्यावर अमानुश असा अत्याचार केला जात असे प्रसंगी बहिष्कारासारखे अस्त्र त्यांच्या विरूध्द वापरले जात असत .काही वेळा तर त्यांना जिवांशीही मारले जात असत .अशा परीस्थितीत महार वतन बंद करणे म्हणजे फार मोठी कांती झाली असे म्हणावे लागेल .एवढेच नाही तर महार वतन बंद केल्यामुळे महार लोकांना त्यांच्या मर्जीप्रमाणे व्यवसाय करण्याची व त्या व्यावसायाप्रमाणे मोबदला मिळण्याची संधी मिळाली .त्यामुळे या लोकांना त्यांच्या जिवनात नवसजीवंनी मिळाली होती . जे की त्यांच्या जाणता राजाने मिळवुन दिली होती,नव्हे पुरोगामी इतिहास निर्माण झाला होता .म्हणुनच बाबासाहेब शाहु महाराजाना “अस्पृश्यांचा सखा” असा उल्लेख करतात .ज्यामुळे शेकडो वर्षाचा इतिहास बदललेला होता . .अशा पध्दतीचे कायदे व हुकुमनामे भारतदेशाला नविनच दिशा देणारे ठरत होते . त्यातुन नविनच इतिहास घडत होता .अस्तित्वात असलेल्या संस्थानिकांत करवीर संस्थान एक असे संस्थान होते ज्यात रयतेच्या कल्याणाचे जाहीरनामे निघत होते .

वेदोक्त प्रकरण- छ .शाहु महाराज शुद्र . . . ?

एकदा छ .शाहु महाराज कार्तिकी स्नान करण्यासाठी पंचगंगेवर गेले असताना त्यांच्या सोबत गेलेले राजपुरोहिताचे काम करणारे नारायणभट्ट राजोपाध्याय स्नान न करताच मंत्र चालु केले आणि तेही पुराणोक्त मंत्र .ही शंका जेव्हा राजारामशास्त्रीना आली तेव्हा ही शंका महाजाच्या नजरेस अणुन दिली .महाराजांनी नारायणभट्टाला हा जाब विचारताच नारायणभटट उदगारले, “महाराज, वेदोक्त मंत्र उच्चारण्यापुर्वी स्नान हे करावेच लागतात मात्र पुराणोक्त मंत्र हे स्नान न करता म्हटले जाते .आणि शुद्रासाठीच म्हटले जाते .” म्हणजे आम्ही शुद्र आहोत की काय ? चढत्या आवाजात शाहु महाराज बोलले . 'होय, महाराज तुम्ही शुद्रच आहात' . हे शब्द छ .शाहु महाराजांच्या कानी येताच तळपायाची आग मस्तकाला गेली .आम्ही 'क्षत्रियकुलावतंस' ही बिरूदावली मिळालेल्या कुळवाडीभूषण छ .शिवाजी महाराजाचे वंशज असताना आणि ती तुम्ही ब्रम्हवृंदानीच दिली असताना देखील आज तुम्ही आम्हाला शुद्र म्हणता . . . ??

लोकमान्य मनविणारे बाळ गंगाधर टिळक आपल्या केसरीतुन उत्तर देतात, “शिवाजी महाराजांना आम्ही (ब्राम्हणांनी) क्षत्रियत्वाची तात्पुरती सवलत दिली होती .” दि .**29** ऑक्टोबर **1901** रोजी केसरीतच टिळक ' वेदोक्ताचे खुळ ' या अग्रलेखात लिहतात , धर्मशास्त्रावरील जे प्रसिध्द आणि सर्वमान्य ग्रंथकार आहेत त्यांच्या मते, ख-या क्षत्रिय व वैश्य या जाती पुर्ण नष्ट झाल्या असुन फक्त ब्राम्हण आणि शुद्र या दोनच जाती सध्या अस्तित्वात आहेत” पुढे म्हणतात, “शाहु छत्रपती आणि मराठे यांची वेदोक्ताची मागणी हा वेडेपणा आहे .त्यांनी तो अविचार सोडुन द्यावा ते अनैतिक आहे .” यापुढे टिळक छ .शाहु महाराज व मराठयांना प्रश्न विचारातात “ शाहु छत्रपती आणि आजचे मराठे आपणास शिवछत्रपतीच्यापेक्षा आधिक थोर समजतात काय ?”

अशा चौफेर टीकेमुळे राजर्षी शाहु महाराज हातबल झाले होते आणि शेवटी ब्राम्हण आणि वेदोक्त प्रकरण सुरू झाले .**1899** मध्ये घडलेल्या या घटनेमुळे करवीर संस्थानातील जनतेत असंतोष उफाळुन आला होता .त्याची परीणीती **1900** मध्ये झालेल्या कार्तिकी एकादशीच्या स्नानाच्या वेळी झाली .ब्रम्हवृंदासाठी पंचगंगेवर असलेला घाट राखीव होता .त्यावर इतर वर्गातील जातीचे लोक स्नान करीत नसत .परंतु यावेळी मात्र लोक बेभान झाले होते .कारण ज्यांनी आपल्याला मायेची माया दिली, ज्यांनी आपल्याला जिवापाड सांभाळले अनेक जनकल्याणाची कामे केली अशा आमच्या लोकनायकास 'शुद्र' म्हणुन हिणवनारे ब्राम्हण कोण? असा विचार करणारे 'ब्राम्हण म्हणुन कोण मुलाहिजा करतो' असे मनणा-या छ .शिवाजी महाराजांचे वंशज !होय . .छ .शाहु महाराजांच्या कृपाछायेत वाढलेली जनता 'ब्राम्हणासाठी राखीव' असलेल्या घाटावर प्रवेश करते व तेथे जावुन 'ब्राम्हणासाठी राखीव' अशा नावाच्या पाटया उपसुन पंचगंगेत फेकुन देतात .एवढेच नाही तर तेथे त्यांना जो हक्क नव्हता तो म्हणजे 'स्नान'करण्याचा तोही बजावता आणि एक नवा इतिहास निर्माण करतात जो पुर्वपरंपरेने त्यांना नाकारलेला असतो तो मिळवतात .यावरून कोल्हापुर संस्थानात वातावरण आधिकच तापले .ब्रम्हवृंद छ .शाहु महाराजावर अधिकच टीकेची झोड उठविली .

छत्रपती शाहु महाराज नारायणराव राजोपाध्ये लिखीत व तोंडी सुचना व समजावणी देवुनही राजपुरोहिताचे कार्ये करण्यासाठी टाळाटाळ केल्यामुळे शेवटचा पर्याय म्हणुन नाइलाजास्ताव त्यांचे वतन जप्त करतात . त्यामुळे शाहु महाराजाना टिळक निर्वाणीचा सल्ला देतात . **20** मे **1902** मध्ये केसरीत टिळक म्हणतात, “ . . .कोणत्याही मनुष्यास आपल्या घरची कृत्ये वेदोक्त रीतीने करण्याचा या राज्यात अनियंत्रित अधिकार आहे .परंतु जे ब्राम्हण अशा रीतीने हव्या त्यांच्या घरी वेदोक्त कर्मे करतील त्यास इतर ब्रम्हवृंदाने आपल्या समाजात घेतलेच पाहिजे असा आग्रह कोणासही धरता यावयाचा नाही .पुर्वीचे उपाध्ये आपले घरी जर वेदोक्त कर्मे करीत नाहीत तर दुसरे नेमा पण इनाम काढुन घेणे म्हणजे एक प्रकारे जुलुम करण्यासारखे होय .” म्हणजे त्या सल्ल्यात एक प्रकारची भिती बाळ गंगाधर टिळक शाहु महाराजाना तसेच अप्रत्यक्ष ब्राम्हणालाही (जाती बहिष्काराची) दाखवत असतात .त्याच काळात छ . शाहु महाराज परदेश गमन केल्यामुळे तर ब्राम्हवृंद मनावयासा सुरूवात करतात की, शाहु महाराजानी धर्म बुडविला .म्हणुन राजधर्म शिल्लक राहत नाही .शाहु महाराजावर धर्माचा कोप येईल .त्यांना धर्मसंकटाला सामोरे जावे लागेल .अशा प्रकारची भीती छ .शाहु महाराजांना दाखवु लागतात .वेदोक्त प्रकरणामुळे छत्रपती शाहु महाराजांवर ब्राम्हण नाराज झाले होते .त्यामुळे ब्राम्हणांचा शाप डोक्यावर घेऊन विदेशात जाणे बरे नव्हे अशा प्रकारचा सल्ला त्यांचे हितसबंधी असणारे ब्राम्हण देऊ लागले .त्याचक्षणी छ .शाहु महाराज त्यांना उत्तर देतात, “माझे पुर्वज ब्राम्हणांचे आशीर्वाद घेवुन विलायतेस गेले असताना त्यांच्यावर दुर्दैव ओढवले .ब्राम्हणांच्या शापामुळे तरी माझ्या घराण्याचे काही कल्याण होते की काय हे मला आता पहावयाचे आहे” .

छत्रपती शाहु महाराजांना कळून चुकले की, ब्राम्हण केवळ आपल्या स्वार्थासाठीच अशी कर्मकांढे करीत असतात म्हणुन असल्या कार्मकांडातुन बाहेर आले पाहीजे आणि या ब्राम्हणशाहीला धडा शिकवलाच पाहीजे म्हणुन प्रयत्न करू लागले .त्यातला एक भाग म्हणुन ब्राम्हण पुरोहिताच्या हातुन कोणतेही कर्मकांडे करायचे नाहीअसा निर्धार केला .पर्यायी व्यवस्था म्हणुन त्यांनी क्षात्रजगतगुरूपदाची निर्मीती केली . क्षात्रजगतगुरूपदावर मराठा जातीच्या व्यक्तीची नेमणुक करून त्यांच्याकडुनच कोणतेही धार्मिक विधी करून घेऊ लागले . अर्थात शाहु महाराजांच्या या कृत्यामुळे ब्राम्हणाबरोबरच ब्राम्हेत्तराकडुनही यावर विरोध होऊलागला .भास्करराव जाधवांच्या मते महाराज ब्राम्हणी धर्म व्यवस्थेला एक प्रकारे प्रोत्साहन देत आहेत .म्हणजेच महाराज चार्तुवर्णिय व्यवस्थेचे पुरस्कर्ते आहेत .

छ .शाहु महाराजांना वेदोक्त प्रकरणामुळे जाग आली होती .कारण छ .शाहु महाराजांना ब्राम्हणांनी मोठया प्रमाणात छळले होते .शुद्र म्हणुन हिणवले होते .त्यामुळे त्यांना जातीयता, अस्पृश्यता ब्राम्हणी वर्चेत्वाचा तिटकारा आला होता .भारतातील विषमता नष्ट करावयाची असेल तर जातीयता नष्ट केली पाहीजे आणि जातीयता नष्ट करावयाची असेल तर उच्च मानले गेलेल्या जातीनेच पुढाकार घेतला पाहिजे असे मत छत्रपती शाहु महाराज मांडीत होते .जपानमधील सामुराई या उच्च जातीने तेथील जातीयता नष्ट करण्यासाठी पुढाकार घेतल्यामुळेच तेथील जातीयता नष्ट झाली आहे आणि म्हणुन तो देश पुढारलेला आहे”असे छ .शाहु महाराज नेहमी वाटत असे .त्याच प्रकारे येथे झाले तर निश्‍चितच या देशातील विषमता नष्ट होऊन देश एका सर्वोच्च पातळीवर विराजमान होईल असे म्हणत .

छ .शाहु महाराजांवर म .फुलेंच्या विचाराचा प्रभाव पडलेला होता . महात्मा फुले म्हणाले होते, “ अहो, हे महार- मांग परके नाहीत, तुमचेच आहेत .तुमच्या वंशाचे, तुम्हच्या रक्ताचे, तुम्हाचे भाऊबंद आहेत .या काव्यबाज सनातन्यानी तुमच्यात आणि त्यांच्यात भेद पाडला .तुमच्यापासुन त्यांना आलग केले .तुम्ही त्यांना जवळ करा .आपल्यात घ्या .ते आपलेच आहेत .”

म .फुले म्हणतात, “विद्येविना मती गेली . . .मतीविणा नीती गेली . .नीतीविना गती गेली . .गतीविना वित्त गेले . .वित्तविणा शुद्र खचले . . .एवढे अनर्थ एका अविद्येने केले”

यातील सकारात्मक बाबी विचारात घेतल्या तर शुद्र खचण्याचे, त्यांची अधोगती होण्याचे एकमेव कारण म्हणजे विद्या .ज्ञान नसल्यामुळे आणि ते त्यांना

ब्राम्हणी व्यवस्थेने देण्यास नाकारल्यामुळेच त्यांची अधोगती झालेली आहे म्हणुन त्यांना शिक्षण दिले पाहिजे. या विचारातुन त्यांनी शुद्र मानलेल्यांना शिक्षण देण्याचे प्रयत्न चालु केले.

छ. शाहु महाराज जेव्हा शैक्षणिक सुधारणा करण्याच्या मार्गाला लागले होते तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की, ब्राम्हणेत्तराचे शैक्षणिक मागासलेपण आजुनही अधिक आहे. आजही ब्राम्हण शैक्षणिक क्षेत्रात मक्तेदार आहेत. उदा. **1881** च्या जनगणेनुसार कोल्हापुर संस्थानात **79.1** टक्के ब्राम्हणांच्या साक्षरतेचे प्रमाण होते तर मराठा समाजात **8.6** टक्के लोक साक्षर होते. याच वर्षी राजाराम कॉलेजमध्ये एकुण **61** विद्यार्थपैकी **55** मुले केवळ ब्राम्हणांची होती. तर राजाराम हायस्कुल मध्ये एकुण विद्यार्थी संख्या **441** इतकी होती. त्यामध्ये ब्राम्हण विद्यार्थी **368** इतके होते. ही बाब शाहु महाराजांच्या लक्षात आली आणि निर्णय घेतला की, अस्पृश्यांना शिक्षण द्यावयाचे. शिक्षणाशिवाय त्यांचा सामाजिक दर्जा उंचावणार नाही. त्यांना जर मान-सन्मानाने जगायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही याची जाणिव छ. शाहु महाराजांना झाली. म्हणुन ते अस्पृश्याच्या उध्दारासाठी आपले सर्वस्व पणाला लावण्यास तयार झाले होते हे पुढील वाक्यावरून लक्षात येते. जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य उध्दारांच्या उद्देशाने नीधी जमा ('डिप्रेस्ड क्लास इन्स्टिटयुट' ह्या संस्थेमार्फत) करण्याच्या संदर्भात छ. शाहु महाराजांशी बोलणी करताच शाहु महाराज म्हणाले होते, "आंबेडकर, मी या संस्थेचे अध्यक्षत व्हायला तयार आहोत असे नाही तर मी दुय्यम कार्यवाह म्हणुनही आंनदाने काम करण्यास तयार आहे."

ज्या अस्पृश्यांच्या पिढयांनपिढया अज्ञानाच्या अंधकारमय काळोख्यात गेल्या. त्यांना प्रकाशमय जिवन देवून दैदिप्यमान करण्याण्यासाठी शाहु महाराजांनी त्या अस्पृश्यासाठी प्राथमिक शाळा काढल्या आणि तेही मोफत शिक्षण दिले. जर कोणी आपल्या मुलाला शाळेत पाठवत नसेल तर मुलांच्या पालकांस सक्ती करण्यात आली. पालकांस प्रतिदिन रू. **1** दंड आकारण्यात यावा असा हुकुम शाहु महाराजांनी काढला. मुलांच्या राहण्याची सोय म्हणुन शाहु महाराजांनी कोल्हापुर संस्थानात वस्तीगृह काढले. जातवार शाळा जातीयता वाढवतात, अस्पृश्यांच्या मुलांना वाईट वागणुक देवुन छळले जाते. जातवार शाळा असल्यास जातीयता वाढीस लागते. छ. शाहु महाराज **15** जानेवारी **1919** रोजी काढलेल्या जाहीरनाम्यात म्हणतात, "हुजुरांच्या असे पाहण्यात आले आहे की, अस्पृश्यांना व स्पश्यांना शाळाखात्यात निरनिराळया त-हेने वागवले जाते व अस्पृश्यांना शाळा खात्याच्या इमारतीच्या कंपाऊडच्या आत येऊ दिले जात नाही. सरकारी इमारती खाजगी उपयोगासाठी दिलेल्या नसल्यामुळे अस्पृश्यांना तुच्छतेने वागवण्याचा कोणालाही हक्क नसुन अस्पृश्यांची प्रत्येक त-हेने काळजी घेतली पाहीजे." **30** सप्टेंबर **1019** साली अस्पृश्यांच्या वेगळया प्राथमिक शाळा व महाविद्यालय बंद करण्याचे आदेश शिक्षण खात्याला देतात. त्याचा परीणाम असा झाला की, अस्पृश्यांची मुले शिकु लागली. कष्टाने अभ्यास करू लागली. आपली गुणवत्ता सिध्द करू लागले. जे गुणवान विद्यार्थी आहेत अशा विद्यार्थांना आपल्या संस्थानात मोठमोठया पदावर रूजू होवू लागले. मॅट्रीक परीक्षा पास झालेल्या महार, मांग आणि चांभार जातीच्या विद्यार्थ्याना महाराजांनी वकीलीच्या सनदा दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी मदत केली. त्यांच्या 'मुकनायक'या साप्ताहीकास सहाय्य करून बंद पडलेले साप्ताहीकास चालु केले. एवढेच नाही तर **20** फेब्रुवारी **1920** रोजी भरलेल्या 'अखिल भारतीय बहिष्कृत परीषेदेत' अस्पृश्यांना आपला पुढारी मिळाला आहे. हा पुढारी भारतातील महान नेत्यांच्या पंक्तीत बसल्याशिवाय राहणार नाही. हा नेता तुम्हचा उध्दार केल्याशिवाय राहणार नाही अशी माझी मनोदेवता मला सांगते आहे."असे भाकीत करणारे छ. शाहु महाराजच होते. होय! तेच एकमेव नेते होते की, ज्यांची भविष्यवाणी खरी ठरली. (छ. शाहु महारांजाना डॉ. भीमराव आंबेडकर कोण आहेत, त्यांची लायकी काय आहे व ते कोणते महान कार्ये करणार आहेत याची कल्पना **1920** सालीच आली होती. परंतु दुदैवाची बाब म्हणजे ज्याला देशातील जनता 'महात्मा' म्हणते त्या मोहनचंद करमचंद गांधीजीना इ. स. **1930** च काय पंरतु **1948** पर्यंतही समजले नाहीत. येथेच चुकले.) छत्रपती शाहु महाराजांनी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळली जावु नये यासाठीच ऐतिहासीक जाहीरनामा काढुन सार्व जनिक स्थळे व संस्था त्यात विहीरी, तलाव, शाळा, कॉलेजेस, रस्ते, सार्वजनिक वाचनालये, सरकारी कार्यालये इ. अस्पृश्यासाठी खुली केली करणारा जाहीरनामा काढला. अस्पृश्यता नष्ट करावयाची असेल तर केवळ भाषण आणि कायदे करून चालणार नाही तर प्रत्यक्ष कृती केली पाहिजे. म्हणजेच "छ. शाहु महाराज हे केवळ बोलके सुधाकर नव्हते तर ते कर्ते सुधारकही होते." त्यात शाहु महाराजांनी अस्पृश्य मानले गेलेल्या महार जातीतील गंगाराम कांबळेस चहाची टपरी घालुन दिली आणि त्या टपरीवर स्वत: जावुन चहा पीत असत आणि ज्यांना (संस्थानातील अधिकायास व सेवकास) कोणाला माझ्या सह्या घ्यावयाच्या असतील त्यांनी या टपरीवर येवुन खुशाल घ्याव्यात असे बजावले. त्याचा परीणाम असा झाला की छ. शाहु महाराजांबरोबर इतर सनातनी लोकानांही त्या पटरीवर येवुन नाइलाजास्तव का होईना पण चहा प्यावे लागत असे. यालाच म्हणतात, 'ग्यानबाची मेख', त्यांना म्हणतात कर्ते सुधारक. दुसरी बाब म्हणजे कुस्तीच्या मैदानात अस्पृश्यांच्या पैलवानाशी उच्चवर्णियाचे पैलवान कुस्ती धरण्यास तयार नसत अशा वेळी महाराजानी महार, चांभार, भंगी पैलवानांची चक्क नावेच बदलुन टाकली त्यांना अनुक्रमे जाट, सरदार,आणि पंडित अशा नावाने ओळखावे असा एक जाहीरनामाच काढला. तसेच महारांकडे उच्चवर्णियाचा बघण्याचा दृष्टीकोण बदलावा म्हणुन शाहु महाराजांनी **31** जुलै **1920** रोजी वटहुकुम काढुन **16** महारांच्या चक्क पोलिस म्हणुनच नेमणुक केल्या. एवढेच नाही तर अस्पृश्याचे 'सुर्यवंशी'असे नामकरण करून टाकले. (जे की गांधीजीनी दिलेल्या हरीजन या उपाधीपेक्षा तरी बरे होते.) दुसरे महत्वाचे म्हणजे शाहु महाराज म्हणत जातीयता नष्ट करावयाची असेल तर आंतरजातीय विवाहाबरोबरच आंतरधर्मिय विवाह केले पाहीजेत. येथेही छ. शाहु महाराज केवळ बोललेच नाहीत तर करूनही दाखवतात. त्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहास प्रेरणा देण्यासाठी 'पटेल बिल' मांडले. ऐवढेच नाही तर त्यांनी धनगर - मराठा यांच्यात विवाह देखील घडवुन आणला. त्यात इंदुरचे युवराज यशवंतराव होळकर (धनगर)आणि कागलचे श्रीमंत काकासाहेब गायकवाड (मराठा) यांची कन्या चंद्रप्रभाबाई यांचा साखरपुडा **30** डिसेंबर **1923** रोजी घडवुन आणला आणि त्यांच्यात पुढे चालुन विवाहही झाला. (परंतु दुदैव असे की, त्यांच्या विवाहस शाहु महाराज हयात नव्हते)

छ. शाहु महाराजांच्या काळात स्त्रीयानांही कावडीमोल वागविले जात होते. स्त्रीयांचे 'चूल आणि मुल' ऐवढेच मर्यादेत कार्ये असावे असा संकुचित विचार रूढ होता. ऐवढेच नाही तर पतीच्या निधनानंतर स्त्रीयांना जगण्याचाही हक्क नव्हता. म्हणजे त्याकाळात सतीची प्रथा, देवदासी, कन्याहत्या इ. प्रथा मोठया प्रमाणात चालत होत्या. सती प्रथा ही पतीच्या निधनानंतर पत्नीला मृत पतीच्या सरणावर जिवंत जाळले जात होते. इ. स. **1815** ते **1828** या कालावधीच्या दरम्यान भारतात एकुण **8,164** स्त्रीयांना सतीच्या नावाने जिवंत जाळले गेले. म्हणुन छ. शाहु महाराजांनी आपल्या संस्थानात असणा-या स्त्रीयांना मानाचे, सन्मानाचे जिवन जगण्यास प्रेरीत केले. स्त्रीचा पती मृत्यू पावला असेल तर तील दुसरा विवाह करण्यास प्रेरीत केले. त्यांना स्वत:चे व्यवसाय काढुन दिले. मुलींना शिक्षण देण्यासाठी प्रोत्साहन दिले. मुली शिकाव्यात म्हणुन त्यांना शिष्यवृत्ती, राहण्यासाठी वस्तीगृहाची सोय करून दिल्या. म्हणुन त्यांच्या संस्थानात स्त्रीया शिकु लागल्या, निर्भीडपणे जगु लागल्या. त्यांच्या काळात करवीर संस्थान पुरोगामी विचारसरणीचे बनले. म्हणुन सतीच्या नावाने एखादया स्त्रीला जीवंत जाळल्याचे उदाहरण नाही.

आरक्षणाचे निर्माते छ. शाहु महाराज : अंधकारात तडफडत जिवन जगत असलेल्या अस्पृश्य समाजाला सहाय्याची गरज होती. कारण त्या काळात त्या समाजाला कोणीच वाली उरला नव्हता, ब्राम्हणवर्गाने शेकडो वर्षापासुन या देशात कल्पनेवर अधारीत मानवी मनावर अघात करणारे (तर्कबुध्दीचा वापर न करता विश्वास ठेवण्यास भाग पाडणारे) अविवेकी धर्मग्रंथ लिहुन सा-या भारत देशाला आपल्या मायाजाळात अडकावुन ठेवुन या देशातील सारी सत्ता, संपत्ती उपभोगत बसले आहेत. याची जाणिव छ. शाहु महाराजांना होण्यास वेळ लागला नाही. शाहु महाराजांना **1894** मध्ये करवीर संस्थानात जनरल खात्यात **71** अधिका-यापैकी **68** अधिकारी केवळ ब्राम्हण होते हे लक्षात येताच ही ब्राम्हणी मक्तेदारी नष्ट केली पाहीजे. करवीर संस्थान केवळ ब्राम्हणासाठीच नाही तर सर्व जनतेच्यासाठी आहे. म्हणुन सर्व वर्गाला या संस्थानाचा लाभ झाला पाहीजे तसेच दुर्बल घटकाला न्याय मिळाला पाहीजे तसेच देशात समता, न्याय प्रस्थापीत झाले पाहीजे याची जाणिव त्यांना झाली. म्हणुन छ. शाहु महाराजांनी **26** जुलै **1902** रोजी मागासवर्गीयांसाठी सरकारी नैक-यामध्ये **50** टक्के आरक्षण असावे असा जाहीरनामा काढला. त्यात छ. शाहु महाराज म्हणतात, "...उच्च प्रतिचे शिक्षणापर्यंत महाराज सरकारच्या प्रजाजनापैकी मागासलेल्या वर्णाना अभ्यास करावे म्हणुन उत्तेजन दाखल आपल्या संस्थानच्या नैकरीचा आजपर्यत चालु असल्यापेक्षा बराच मोठा भाग या लोकाकरीता निराळया राखुन ठेवणे इष्ट होईल असे सरकारांनी ठरविले आहे.

ह्या रीतीस अनुलक्षुन महाराज सरकार असा हुकुम करतात की, हा हुकुम पोहचल्या तारखेपासुन रिकामे झालेल्या जाग्यापैकी शेकडा पन्नास जागा

मागासलेल्या लोकांस भराव्या . ज्या ऑफिसमध्ये मागासलेल्या वर्गाच्या अमलदाराचे प्रमाण सध्या शेकडा पन्नासपैकी कमी असेल तर पुढील नेमणुक ह्या वर्णातील व्यक्तिीची करावी .

. . . सुचना- मागासलेल्या वर्णाचा अर्थ ब्राम्हण, परशू ,शेणवी ,पारशी व दुसरे पुढे गेलेल्या वर्ण खेरीज करून सर्व वर्ण असा समजावा . " (करवीर संस्थानचे गॅजेट भा . **1** ता . **2** ऑगस्ट **1902**)

इतिहासाला लाजवेल असा हा ऐतिहासीक जाहीरनामा करवीर संस्थानात रयतेच्या राजाने पहिल्यांदाच लागु केला (**664** संस्थानापैकी) . त्यामुळे मागासलेल्या वर्गातीला लोक नेकरीवर रूजू लागले . ताठ मानेने जगु लागले . हे ब्रम्हवृंदाला देखवले नाही . त्यामुळे शाहु महाराजांवर केसरीतुन व इतर वृत्तमान पत्रातुन टिकेची आगपाकड होऊलागली . गुणत्तेच्या अधारावर नौक-या दिल्या पाहीजेत, कमी गुणवत्तेच्या अधारावर शुद्राना नौक-या देतात म्हणजे आमच्यावर अन्याय होतो आहे अशी ओरड ब्रम्हवृंद करू लागले . (सांगली संस्थानातील पटवर्धन संस्थानिकांचा एक कारकुन ॲड . गणपत अंभ्यकरने गुणत्तेच्या अधारावर नौक-या दिल्या पाहीजेत, असे शाहु महाराजांना म्हणाले होते . त्याला उत्तर म्हणुन महाराजानी तबेल्यात असलेल्या अंपग, अशक्त व कमजोर घोडयांची सशक्त घोडयांकडुन कशी गळचेपी केली जाते तसेच त्यांच्याकडुन या अशक्त घोडयांना काहीच मिळु दिले जात नाही म्हणुन ते उपाशीच राहतात याची प्रत्यक्ष कृती दाखवुन आरक्षण दुर्बल घटकाना कसे अवश्यक आहे हे पटवुन दिले हे आपणाला सर्वश्रुतच आहे . ) बाळ गंगाधर टिळक यांनी आपल्या केसरीतुन मोठया प्रमाणात टिकेची झोड उठवली होती . टिळक या जाहीरनाम्यावर टिका करताना असे म्हणतात की, "हा जाहीरनामा केवळ ब्राम्हणालाच धक्का देणारा नाही तर संस्थानच्या हितकर्त्यानाही धक्का देणारा आहे . . ." विचारात घेण्यासारखी बाब म्हणजे जेव्हा हा जाहीरनामा प्रसिध्द झाला होता तेव्हा करवीर संस्थानात एकुण लोकसंख्यापैकी ब्राम्हणांची लोकसंख्या **3** टक्के होती, तर **97** टक्के ब्राम्हणेत्तरांची लोकसंख्या संस्थानात राहत होते . खरेतर ब्राम्हणेत्तरांवच अन्याय झाला होता कारण **97** टक्के ब्राम्हणेत्तरांना **50** टक्के आरक्षण दिले होते तर **3** टक्के ब्राम्हणांना **50** टक्के आरक्षण ठेवले होत . म्हणुन लोकमान्या मनविणां-या बाळ गंगाधर टिळकांनी ब्राम्हणेत्तरावर अन्याय झाला असे मनायला पाहिजे होते . पंरतु ब्राम्हणेत्तरांचे हित करावे असे त्यांना वाटले तरच ना . . . !

छ . शाहु महाराजाच्या या ऐतिहासीक पराकमामुळे अवघ्या भारताचा इतिहास बदलत चालला होता . महाराज ज्या पध्दतीने अस्पृश्य उध्दाराची तसेच पुरोगामी विचाराची अशी भिंत उभी करण्याच्या प्रयत्नात होते की, ज्या भींतीमुळे शेकडो वर्ष न भेदलेल्या कठोर अशा भिंतीला छेदुन त्यावर नविन अशी भिंत उभी राहत होती ज्यामुळे येथे दबलेला, पीळलेला, अपमानीत झालेला तसेच बहिष्कृत झालेलेल्यांना संरक्षण मिळत होते . डॉ . बाबासाहेब आंबेडकरांसारखे भारतरत्न, भास्करराव जाधवासारखे विद्वान आणि आज जो पुरोगामी विचारावर (ज्यात स्वतज्य समता आणि न्याय या त्रिसुत्रावर) समाज, देश उभा आहे तो छ . शाहु महाराजांच्या अनमोल अशा त्यांच्या त्यागाची देण आहे . छ . शाहु महाराज दिर्घायुष्यी जगले असते तर . . . आजचा भारत अनेक वर्ष पुढे गेला असता . पंरतु नियतीचा काळ कोणीही बदलु शकत नाही . अशा या लोकनायकाला **5** मे **1922** रोजी आपल्या बहुजनांना शेवटचा निरोप द्यावा लागला . अस्पृश्याचा सखा गेला . शेतक-यांचा, अस्पृश्यांचा खरा वाली पडद्याआड गेला . करवीर संस्थान पोरके झाले . पंरतु भारतदेशला समता, आणि बंधुता देवुन ते गेले जे कधीही न जाणारे . इतिहास शाहु महाराज कधीही विसरणार नाही . परंतु त्यातल्या त्यात या देशातील अस्पृश्य मानले गेलेला ज्यांना सर्वानीच बहिष्कृत केले होते ज्यांच्यावर जाणता राजा छ . शाहु महाराज याचे अनंत उपकार आहेत ते तर कधीच विसरणार नाहीत . (छ . शाहु महाराजांनी समाजात समता प्रस्थापीत करण्यासाठी जो त्याग केलेला आहे त्यांच्या स्मृतीप्रीत्यात त्यांचा **26** जुन हा जन्मदिवस 'समता' दिवस म्हणुन पाळला जातो) **4** नोव्हेंबर **1927** मध्ये 'बहिष्कृत भारत' या अकांत छ . शाहु महाराजांच्या कार्याचा गुणगैरव यथोचित शब्दात पुढील प्रमाणे करतात . "श्रीमन्महाराज छत्रपतीनी आम्हास ऊजित दशेस आणावे आणि आमची सुधारणा करावी म्हणुन अनेक मार्गानी प्रयत्न चालाविले आहेत,आमच्यासाठी बोर्डिंगे काढली, विद्यामदिरे खुली केली, कित्येकांना नोक-या दिल्या आणि काहींना वकिलीसारख्या उच्च धंद्यातही प्रवेस करविला आणि स्पश्यास्पृतेचा भेद बाजुला ठेवुन सरकारांनी आम्हास मुलांप्रमाणे ममतेने वागविले! याबद्दल आमचा समाज हुजुरांस देवाप्रमाणे पुज्य मानीत आहे आणि या औदार्याबद्दल पिढयानुपीठया हा समाज हुजुरचरणांचा ऋणी राहील !"

छ . शाहु महाराज उदार अंत :करणाचे होते . त्यांचे मन अकाशा ऐवढे विशाल होते . त्यांनी आपल्य रयतेला सर्वस्व अर्पन केले होते . त्याचा पुरावा कर्मवीर भाऊराव पाटलाच्या विधानावरून लक्षात येते . रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा येथे 'छ . शाहु बोर्डींग हाऊस'स्थापन केले होते . त्या बोर्डींगला जेव्हा गांधीजीनी भेट दिली . तेव्हा गांधीजीनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना विचारले होते की, "भाऊरावजी , आपने इस बोर्डीग को राजश्री शाहु महाराज का नाम दिया है ! उन्होने आपको कितने रूपये दिये है?" त्यावर कर्मवीर भाऊराव पााटलांनी मोठया अभिमानाने मोठया आवाजात उद्‌गारले, "मैने कुछ भी पैसा नही लिया ! लेकिन मैने उनसे बडा दिल लाया हूँ |"

संदर्भ


**1** . छ . शाहु महाराज :एक समाजकांतीकारक राजा - धनजंय कीर : पॉप्युलर प्रकाशन मुंबई **1979**

**2** . राजर्षी शाहु राजा व माणुस -कृ . गो . सोमवंशी

**3** . डॉ . बाबासाहेब आंबेडकर- बहिकृत भारत आणि जनता

**4** . मराठा कुणबी ओबीसी -मा . वामन मेश्राम (राष्ट्रीय अध्यक्ष , बामसेफ -मुलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पुणे)

**5** . लोकराजा शाहु छत्रपती डॉ . रमेश जाधव- सुरेश एजन्सी पुणे

**6** . राजर्षी शाहु महाराज डॉ . कुमार अनिल -रयत मॅकमिलन

**7** . राजर्षी शाहु छत्रपतीचें जाहीरनामे व हुकुमनामे - संपादक डॉ . जयसिंगराव पवार -सुमेरू प्रकाशन डोबिवली (पू . )

**8** . देवदासी, सती- प्रथा और कन्या हत्या (सैतानी लीलाओ का रक्त रंजित इतिहास) शीतल सहाय और अतुल कृष्ण विश्वास गौतम बुक सेंटर दिल्ली-**1100093**